**ठळक बातम्या**

- अहमदाबाद इथं नागरी वस्तीत विमान कोसळून अपघात
- डीबीटी व्यवहारांमधे म्हणजेच थेट लाभ हस्तांतरणात गेल्या दशकात नव्वद पट वाढ
- यंदाचा योग दिन सोहळा एकाच वेळी देशभरात एक लाखाहून अधिक योग कार्यक्रमांनी साजरा होणार/ विशाखापट्टणममधल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री घेणार सहभाग

**आणि**

- सूर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेलांसह कच्च्या खाद्यतेलावरच्या सीमा शुल्कात कपात

<><><><><>

गुजरातमधे अहमदाबाद इथं एक प्रवासी विमान कोसळल्याची घटना आज घडली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं. बचावकार्य सोपं व्हावं यासाठी अपघातस्थळाकडे जाणारे सर्व मार्ग बंद करण्यात आले आहेत, अशी माहिती आमच्या वार्ताहराने दिली आहे. जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल केलं असून अपघाताच्या कारणाचा शोध घेतला जात आहे. धुरामुळे परिसरात अंधार पसरला असून मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाल्याची भिती व्यक्त केली जात आहे. हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होतं, आणि त्यात प्रवासी आणि कर्मचारी मिळून २४२जण होते. या घटनेबद्दल अधिक माहिती घेत आहोत असं एअर इंडिया कंपनीने आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. या घटनेमुळे आपल्याला धक्का बसला असून तीव्र दुःख झालं आहे, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू

यांनी म्हटलं आहे. सर्व आपत्कालीन प्रतिसाद दलांना कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, घटनास्थळी बचाव पथकं आणि वैद्यकीय पथकं पाठवली जात आहेत, असं नायडू यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

तंत्रज्ञानाच्या प्रगतीत आणि देशाच्या आत्मनिर्भरतेला चालना देण्यात भारताच्या तरुण नवोन्मेषकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं कौतुक केलं आहे. रालोआ सरकारने सुरू केलेल्या डिजिटल इंडिया उपक्रमामुळे तरुणवर्ग नवोन्मेषासाठी सक्षम बनला आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर तंत्रज्ञान महासत्ता म्हणून भारताचं स्थान बळकट झालं आहे, असं प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

<><><><><>

डीबीटी व्यवहारांमधे म्हणजेच थेट लाभ हस्तांतरणात गेल्या दशकात नव्वद पटीनं वाढ झाल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. २०१४ मध्ये ७ हजार कोटीहून अधिक असलेली डीबीटीची संख्या गेल्या आर्थिक वर्षात ६ लाख कोटीहून अधिक झाल्याचं अर्थमंत्र्यांनी समाज माध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे. २०२४ -२५ या वर्षात २६० लाख कोटी रुपयांहून अधिक व्यवहार करत भारतानं रिअल टाईम पेमेंटमध्ये जगात आघाडी घेतली असल्याचं त्यांनी आणखी एका संदेशात म्हटलं आहे. दरवर्षी सुमारे १८ हजार ६०० कोटी रुपयांचे व्यवहार होत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

युपीआयद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांसाठी विक्रेत्यांना सवलत देण्यात येणार असल्याचे दावे पूर्णपणे खोटे असल्याचं, केंद्रीय अर्थ मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. काही प्रसारमाध्यमांवरच्या अशा निराधार आणि दिशाभूल करणाऱ्या दाव्यांमुळे

विनाकारण संभ्रम आणि गोंधळ  निर्माण होत असल्याचं मंत्रालयानं  म्हटलं आहे. युपीआय द्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांना सरकार कायम प्रोत्साहन देत राहील, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रसरकारतर्फे  विकसित कृषी संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. परभणी कृषी विज्ञान केंद्र,कृषी विभाग आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने पूर्णा तालुक्यात कातनेश्वर इथं आयोजित अभियानाचा समारोप आज झाला. खरीप पेरणीच्या अनुषंगाने नवीन विकसित झालेले पिकांचे वाण आणि तंत्रज्ञान याविषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ.खिजर बेग यांनी यावेळी सांगितलं....

**होल्ड- बाईट-**

**<><><><><>**

यंदा आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळ्यात येत्या २१ तारखेला सकाळी साडे सहा ते ७ वाजून ४० मिनिटं या वेळेत एक लाखाहून अधिक योग कार्यक्रम एकाच वेळी आयोजित केले जातील, अशी घोषणा केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. ते आज नवी दिल्लीत यंदाच्या योग दिनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. यंदाची योग दिनाची संकल्पना एक पृथ्वी - एक स्वास्थ के लिए योग अशी आहे. यंदाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशात विशाखा पट्टणम इथे होणार असून या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी होतील. त्यांच्यासह सुमारे ४० देशांचे प्रतिनिधी देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत, अशी महिती जाधव यांनी दिली. यंदा साजऱ्या होणाऱ्या या विशेष योग संगमासाठी देशभरातल्या ६५ हजारांहून अधिक संघटनांनी नोंदणी केली आहे.

दिल्लीत लाल किल्ला, कर्तव्य पथ आणि लोधी बाग यासह १११ ठिकाणी योगदिन साजरा करण्यात येणार आहे, असंही जाधव यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, प्रतापराव जाधव यांनी भारत आणि जगभरात योगाचं महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्याला प्रोत्साहन देण्यासाठी मोदी सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांविषयीची माहिती एका विशेष मुलाखतीतून दिली आहे. विकसित भारत का अमृत काल : सेवा, सुशासन, गरीब कल्याण के ११ साल’ या विशेष मालिकेचा भाग म्हणून, ही विशेष मुलाखत आज रात्री साडे नऊ वाजता आकाशवाणी एफएम गोल्ड वाहिनी आणि आकाशवाणीच्या सर्व वाहिन्यांवर प्रसारित केली जाईल.

**<><><><><>**

केंद्रसरकारने सूर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेलांसह कच्च्या खाद्यतेलावरच्या सीमा शुल्कात कपात केली आहे. आता या उत्पादनांवर २० टक्क्यांऐवजी १० टक्के सीमाशुल्क आकारलं जाईल. या निर्णयामुळं खाद्यतेलांच्या किंमती कमी होऊन ग्राहकांना दिलासा मिळेल आणि एकंदर महागाई रोखण्यास मदत होईल, असा विश्वास ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं व्यक्त केला आहे. शुल्क कमी केल्यामुळे देशांतर्गत खाद्यतेल प्रक्रीया उद्योगालाही प्रोत्साहन मिळेल असं मंत्रालयानं म्हटलं आहे. खाद्य तेलउत्पादक कंपन्यांनी सीमाशुल्कातल्या बचतीचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवावा, असं आवाहन सरकारने केलं आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरला जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी यात्रा काळात राज्य परिवहन महामंडळ ५ हजार २०० विशेष बस सोडणार आहे अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते काल पंढरपूर इथं एसटी अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केली तर पंढरपूरला

जाण्यासाठी त्यांच्या गावातून बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. यात्राकाळात होणारी गर्दी लक्षात घेत प्रवाशांच्या सोयीसाठी पंढरपूरमध्ये चार तात्पुरती बस स्थानकं उभारण्यात येणार आहेत.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने मुंबईतल्या सार्वजनिक ठिकाणांवरून टाकाऊ साहित्य संकलन करण्याबाबत विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या अंतर्गत ई विभागातील बेलासिस मार्ग कामाठीपुरा या परिसरात आज स्वच्छता करण्यात आली.

<><><><><>

रत्नागिरी - गणपतीपुळे रस्त्यावर काळबादेवी इथं दोन एसटी बसची समोरासमोर धडक होऊन आज सकाळी अपघात झाला. यामध्ये दोन्ही बसचे चालक किरकोळ जखमी झाले असून, सर्व प्रवासी सुखरूप आहेत. या अपघातातील शहर वाहतूक विभागाची बस रत्नागिरीच्या दिशेने येत होती तर महामंडळाची बस गणपतीपुळ्याच्या दिशेने जात होती, त्यावेळी हा अपघात झाला.

<><><><><>

जळगाव शहरासह जिल्ह्यात काल रात्री प्रचंड वादळी वाऱ्यांसह तुफान पावसाने हजेरी लावली. या पावसाचा जोर इतका प्रचंड होता,की रस्त्यावर ये जा करणाऱ्या वाहनांसह नागरिकांना चालणे देखील अवघड झालं होतं असं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><><>

राज्यात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

मराठवाड्यातल्या बहुतांश भागात येत्या चौदा तारखेपर्यंत वादळी वारे आणि मेघगर्जनेसह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. आगामी तीन दिवस उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई महानगर क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

//<><><><><>//